# यशवंतराव चव्हाण

(दि.१२ मार्च, १९१४ – २५ नोव्हेंबर, १९८४)

(अल्प परिचय)

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री, थोर राष्ट्रीय नेते आणि भारताचे माजी उपपंतप्रधान. देवराष्ट्रे (जि. सांगली) येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्म. प्राथमिक शिक्षण कराड येथे घेऊन उच्च शिक्षण कोल्हापूर व पुणे येथे घेतले आणि बी. ए.एल.एल.बी. झाले. सन १९३० साली महात्मा गांधींनी सुरु केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीत त्यांनी भाग घेतला, तेव्हा सन १९३२ साली त्यांना पहिला तुरुंगवास घडला.

सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. सन १९४६ साली तेव्हाच्या मुंबई प्रांताच्या विधिमंडळाची निवडणूक होऊन यशवंतराव दक्षिण सातारा मतदारसंघातून निवडून गेले आणि संसदीय चिटणीस झाले. सन १९४८ साली त्यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या चिटणीस पदावर नियुक्ती झाली व सन १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री झाले. द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ रोजी सूत्रे हाती घेतली. सन १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली व राज्याचे ते पहिले मुख्यमंत्री झाले. पुढे सन १९६२-६६ या काळात ते भारताचे संरक्षणमंत्री, सन १९६६-७० गृहमंत्री, सन १९७०-७४ पर्यंत अर्थमंत्री आणि सन १९७४ पासून परराष्ट्रमंत्री बनले.

कार्यक्षम कारभारातून त्यांनी शासकीय तसेच प्रशासकीय कौशल्याचा व लोकनेतृत्वाचा प्रत्यय आणून दिला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण खात्यात चैतन्य आणण्याची जबाबदारी यशवंतरावांनी पार पाडली. बांगला देशाचे युद्ध, दुष्काळ वगैरेंमुळे खालावलेल्या आर्थिक परिस्थितीत अर्थखाते त्यांच्याकडे आले. माजी संस्थानिकांचे तनखे रद्द करणे इ. उपाययोजना त्यांच्या कारकीर्दीत झाल्या. चलनवाढीला आळा घालण्याचे कडक उपाय योजण्याच्या धोरणाचा प्रारंभही यशवंतरावांच्या कारकीर्दीत झाला.

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राला तसेच देशाला कायदा व सुव्यवस्था आणि विकासाभिमुख प्रशासनाची गरज आहे, हे ओळखणाऱ्या द्रष्ट्या व्यक्तींमध्ये यशवंतराव अग्रगण्य होते. विकासाभिमुख प्रशासनाची गरज ओळखण्यामध्ये यशवंतरावांचे जसे द्रष्टेपण होते तसेच ते महाराष्ट्र राज्यामध्ये त्याची यशस्वी अंमलबजावणी करण्यात देखील होते. प्रशासनाची एक वेगळीच छाप दाखवून, त्याचा आदर्श वस्तुपाठ यशवंतरावांनी देशपातळीवर घालून दिला होता. “सामान्य माणूस” हा त्यांच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक नीतीचा केंद्रबिंदू होता. त्यांनी देशपातळीवर महाराष्ट्र राज्याचा “एक प्रागतिक राज्य” असा लौकीक निर्माण केला.

********

(स्त्रोत – सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)